ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 250-M (NS)**

**Code No. : 250-M (NS)**

# ಡಿ.ಇಡಿ. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ

# D.Ed. SECOND YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)

# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# FACILITATING LEARNING ( HPS )

# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಹೊಸ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**( New Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 10. 12. 2018 ]

Date : 10. 12. 2018 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**सामान्य सूचना :** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास योग्य व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास अवधी दिलेला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सूचनेप्रमाणे लिहा.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडून लिहा. प्रत्येक प्रश्नाला 1 गुण दिलेला आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे.

$10 \times 1 = 10$

1. मानवाच्या मानसिक कृतीना, आलोचनाना आकृतीरूप देणे आणि मार्गदर्शन करणे म्हणजे

(अ) सामाजिक व्यवस्था

(आ) भाषा व्यवस्था

(इ) विचार व्यवस्था

(ई) कार्य व्यवस्था.

2. शिक्षकांजवळ शब्द भंडार इतका असावा

(अ) साधारण

(आ) मर्यादित

(इ) विपुल

(ई) ज्ञान देण्यापुरता.

3. मुलाला ज्या संधी आणि अध्ययनाचे मार्ग मिळतात त्यामध्ये अधिकाधिक संधी आणि अध्ययनाचे मार्ग यांच्याकडून मिळतात.

(अ) मित्रांकडून आणि शिक्षकांकडून

(आ) शेजाऱ्याकडून

(इ) पालकांकडून

(ई) मुख्याध्यापकाकडून.

4. या भाषेचा शिरकाव तसेच इतर भाषांचा शिरकाव करुन माध्यामानो प्रस्तुत केलेले कार्यक्रम लोकप्रिय होत आहेत.

(अ) कन्नड (आ) उर्दू

(इ) तमिळ (ई) इंग्रजी.

5. शिक्षक घरच्या ( मुलांच्या ) भाषेबद्दळ असे असावेत

(अ) तिरस्कार करणारे

(आ) अपमान करणारे

(इ) गौरव करणारे

(ई) स्विकार करणारे.

6. पाठाच्या पायऱ्यामध्ये महत्वाची पायरी ही आहे.

(अ) परिशोध (आ) विस्तार

(इ) मूल्यमापन (ई) सहभाग.

7. प्रारंभिक काळात मूल भाषा अशा प्रकारे शिकते

(अ) सरावाने

(आ) अनुकरणाने

(इ) अनुभवाने

(ई) निसर्गताच.

8. आशुभाषण म्हणजे हे होय

(अ) दिलेल्या वेळेत, दिलेल्या विषयाबद्दल बोलणे

(आ) जास्त तयारी करुन बोलणे

(इ) तयारी नसताना बोलणे

(ई) अचानक बोलणे.

9. भाषा कौशल्याची ही चौथी पायरी आहे

(अ) वाचन

(आ) श्रवण

(इ) लेखन

(ई) भाषण.

10. लेखनात याला अधिक महत्व आहे.

(अ) निबंध लेखनाला

(आ) हस्ताक्षराला

(इ) अनुलेखनाला

(ई) श्रुतलेखनाला.

**भाग - II**

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला 2 गुण ) : $5 \times 2 = 10$

11. मुलाला अध्ययन अनुभव हे कोणत्या गोष्टीना अनुसरुन असले पाहिजे ? वेगॉटसकीच्या सिद्धांताद्वारे स्पष्ट करा.

12. भाषा व इतर विषय शिक्षकाचा समन्वय कसा असावा ?

13. पाठ नियोजनाची आवश्यकता सांगा.

14. शिक्षकांने वर्गात अध्यापन करताना शैक्षणिक साधनांचा उपयोग का करावा ?

15. शिक्षक या नात्याने कथा सांगण्यापूर्वी तुम्ही कोणती तयारी कराल ?

16. वाचन व लेखनाचा संबंध स्पष्ट करा.

17. वाचन म्हणजे काय ?

18. आशुभाषणाने मुलांच्या संभाषण कौशल्याचा विकास होतो. स्पष्ट करा.

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नात निवड दिलेली आहे. त्यातील कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : $8 \times 5 = 40$

19. अ) भाषा हे एक चिंतनाचे माध्यम आहे. कसे ते स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषेचे कार्य स्पष्ट करा.

20. अ) शाळत अध्ययनाचे माध्यम म्हणून मराठी भाषा असावी. याचे समर्थन करा.

**किंवा**

आ) मुलाला त्याच्या घरच्या भाषेतून शाळेच्या भाषेत रूपांतर करण्यास काय केले पाहिजेत ?

21. अ) भाषेच्या अध्ययनात अध्ययन कर्त्याची पार्श्वभुमी स्पष्ट करा.

**किंवा**

आ) रचनावादी सिद्धांताच्या ( 5E ) पायऱ्याचे महत्व स्पष्ट करा.

22. अ) वर्गात भाषा अध्ययनाची अनुकुलता निर्माण करण्यास शिक्षकांने कोणते उपक्रम हाती घेतले पाहिजेत ?

**किंवा**

आ) मातृभाषा हीच शिक्षणाचे माध्यम असेल तर योग्य शिक्षण घेण्यास मदत होते. चर्चा करा.

23. अ) विद्यार्थ्याचे श्रवण सामर्थ्य समजून घेण्यासाठी काय केले पाहिजेत ?

**किंवा**

आ) तुमच्या शाळेच्या परिसरात कचरा भरल्याने पाणी साचून, दुर्गंधी येत आहे. तेंव्हा संबंधीत अधिकाऱ्यांना विनंती पत्र पाठवून तेथील स्वच्छते-विषयी कळवा.

24. अ) बहुभाषावर्गात मुलांचा भाषिक विकास होतो. स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मौखिक अभिव्यक्ती विकसीत करण्यास घेण्यात येणाऱ्या कृतीत पुर्व नियम किंवा अटी महत्वाच्या आहेत. कारणे सांगा.

25. अ) वाचनाची विविध सामर्थ्ये सविस्तर स्पष्ट करा.

**किंवा**

आ) लेखन प्रक्रियेच्या 5 पायऱ्या स्पष्ट करा.

26. अ) वाचन क्लब म्हणजे काय ? तो कसा चालवावा ?

**किंवा**

आ) लेखन अध्यापनाबाबत एन० सी० टी० ई० चे विचार काय आहेत ? ते सांगा.